
वयोवृद्धः मनोयुवा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२

कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.




# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.


वर्ष-३२ अंक-९ किंमत : रु. ३०/- सप्टेंबर २०२४


## २१ सप्टेंबर - अल्झायमर दिन (स्मृतीभ्रंश दिन) निमित्ताने











## सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा..!

## ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापनेच्या निर्णयाबद्दल शासनाचे अभिनंदन

महाराष्ट्र शासन

# मंत्रिमंडळ निर्णय



# ज्येष्ठ नागरिक महामंडळाची स्थापना

दि. २५ ऑगस्ट २०२४

- राज्यातील सुमारे सव्वा कोटींपेक्षा जास्त ज्येष्ठांसाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय
- या निर्णयामुळे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळ, बेरोजगारी, आजारपण, विकलांगता यामध्ये संरक्षण मिळेल आणि त्यांचा वृध्दापकाळ सुसह्य होण्यास मदत होईल.
- या महामंडळाचे मुख्यालय मुंबई येथे असेल आणि महामंडळाचे भागभांडवल ५० कोटी इतके असेल.




फेस्कॉम अध्यक्ष श्री. अरुण रोडे यांचे हस्ते सन्मानपत्र स्वीकारताना सौ. व श्री. प्रशांत पाटील




फेस्कॉम अध्यक्ष श्री. अरुण रोडे यांचे हस्ते 'समाजभूषण' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना सौ. व श्री. प्रशांत पाटील




उद्योजक श्री. प्रशांत पाटील यांचे हस्ते 'समाजभूषण' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना श्री. अरुण रोडे.




फेस्कॉमचे उपाध्यक्ष (मनोहारी कौन्सिल) श्री. अंजुमन खान यांचे हस्ते कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारलेबद्दल सत्कार स्वीकारताना सौ. व श्री. प्रशांत पाटील

# मनोहारी मनोयुवा १६ वा आनंद मेळावा

चाँदसाहेब गवंडी
कोषाध्यक्ष, मो. ९४२११७४५१५

मनोहारी मनोयुवा मासिकाचा आनंद मेळावा घेणेचे विचाराधीन असतानाच सामाजिक कार्याची जाण असलेल्या उद्योगपतीच्या भेटीचा योग आला. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात किमान १ दिवस तरी त्यांचा चेहरा हसतमुख व आनंदी करणेचा विचार त्यांनी बोलून दाखविला. विचारविनिमय झाल्यानंतर २४ ऑगस्ट हा दिवस ठरला. पावसाळ्याचे दिवस. निसर्गराजाचे मन पाहिले. यावर्षी तर निसर्गराजा शेतकऱ्यांच्या प्रेमातच पडला होता. हे प्रेम साधारण दुपारनंतर रात्रीच्या सुमारापर्यंत व्यक्त होत होते. त्यामुळे आनंदमेळावा दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत संपविणेचे नियोजन झाले. १०० फूट x १०० फूट आकाराचा मंडप, प्रसंग पडलेस जेवणासाठी स्वतंत्र व्यवस्था याबाबत चर्चा झाली. मिरज तालुक्यातील आरग येथील धनराज दूध संकलन केंद्राचे श्री. दत्तात्रय शिंदे यांचेकडे नियोजन होते. २०२१ साली झालेल्या मनोयुवाच्या आनंद मेळाव्याचा अनुभव त्यांच्या पाठीशी होता. त्यामुळे कोणत्याही गोष्टीची कमतरता भासणार नाही याची खात्री होती. ५०० ते ६०० निमंत्रणकर्त्यांचे नियोजन केले. फेस्कॉमचे अध्यक्ष मा. अरुणजी रोडे, पुणे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष मा. चंद्रकांत महामुनी आणि हेल्पेज इंडियाचे पुणे विभागाचे मॅनेजर मा. राजीवजी कुलकर्णी यांची स्विकृती मिळाली.

२३ ऑगस्ट उजाडला. दिवसभर पावसाने तुरळक हजेरी लावली. मंडप उभा राहिला. मात्र रात्रभर पावसाने कहर केला. त्याचवेळी महाराष्ट्र बंदची वार्ता धडकली. नियोजनकर्त्यांची धाकधूक वाढली. तरीही निस्वार्थीपणे प्रामाणिक कार्य करणाऱ्यांचा पाठीराखा परमेश्वर असतो याचे प्रत्यंतर आले. २४ तारखेला पावसाने मात्र विश्रांती घेतली. प्रथम ५०-६० ज्येष्ठांचे उपस्थितीत कार्यक्रम करण्याचे नियोजन केले होते. त्यात बदल करून कार्यक्रमासाठी इतर ठिकाणी स्टेज तयार करण्यात आले. सांगली तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून ज्येष्ठ नागरिक दाखल झाले. पाऊस आणि महाराष्ट्र बंदच्या शक्यतेमुळे ज्येष्ठांची उपस्थिती ३५० पर्यंत गेली. अनेक ज्येष्ठ नागरिकांना पावसामुळे काही ठिकाणी रस्ते बंद झाल्यामुळे येता आले नाही.

ज्येष्ठांचा दिवस आनंदमय करावयाचा होता. त्यामुळे संयोजकांनी गीत/गाण्यांचा कार्यक्रम देखील ठेवला होता. फेस्कॉमलाही प्रायोजक आणि त्यांच्या कुटुंबाच्या जीवनातील हा दिवस आनंदमय करावयाचा होता. त्यामुळे प्रायोजक प्रमुख आणि श्रीनिवासा मिल्क अँण्ड मिल्क प्रॉडक्टस् चे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. प्रशांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापून सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी त्यांचे पिताश्री श्री. अनंतराव पाटील देखील ज्येष्ठ नागरिकांनी मुलाला दिलेल्या आशीर्वादामुळे भारावून गेले.

मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा हा खरोखरचा आनंद मेळावा होता. उपस्थित ज्येष्ठांच्या डोक्यातील ताणतणावाचा कचरा काढून टाकणेच्या प्रयत्नाला यश लाभले. संस्थापक अध्यक्ष श्री. प्रशांत पाटील यांच्या सामाजिक कार्याची आणि ज्येष्ठ नागरिक व अनाथांना दिलेल्या मायेच्या आधाराची दखल घेऊन फेस्कॉमचे वतीने मा. अरुणजी रोडे यांचे हस्ते त्यांना 'समाज भूषण' पुरस्काराने सन्मानित करणेत आले. मा. अरुण रोडे आणि मा. राजीव कुलकर्णी यांना 'समाज भूषण' पुरस्काराने, मा. चंद्रकांत महामुनी यांना 'डिजिटल कौशल्य' पुरस्काराने मा. दत्तात्रय शिंदे यांना 'हास्य आनंद' निर्मिती पुरस्काराने, निवृत्त नायब तहसीलदार जयवंतराव दिवे

यांना 'निवृत्त सेवा' पुरस्काराने अंजुमन खान यांना 'प्रबोधन सेवा' पुरस्काराने, मा. सौ. सुशिला ओडेयर यांना 'उत्कृष्ट साहित्यिका' पुरस्काराने सन्मानित करणेत आले. सांगली येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी 'ज्येष्ठ नागरिक कक्ष' गठीत करून गेली १०/१२ वर्षे रुग्णांची सेवा करणाऱ्या मा. दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी यांना 'रुग्ण सेवा' पुरस्कार प्रदान करणेत आला. या सर्व मान्यवरांना हा दिवस आनंदित करणेचा प्रयत्न यशस्वी झाला.

कार्यक्रम प्रसंगी मा. अरुण रोडे यांनी फेस्कॉम महासंघाची संकल्पना आणि उद्दिष्ट/कार्य विषद केले. हेल्पेज इंडियाचे मा. राजीव कुलकर्णी यांनी हेल्पेज इंडियाच्या कार्याची माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवून आशीर्वाद दिलेने भारावून गेलेचे सांगितले. मा. जयवंतराव दिवे यांनी आभार प्रदर्शन केले. स्नेहभोजनाचे कौतुक करावे तेवढे कमीच ठरतील. तेलाचा वापर न करता तुपाचा वापर स्वयंपाकात केल्यामुळे आणि बासुंदीने सर्वच उपस्थित तृप्त झाले.

श्री. बाबर सर यांचे सूत्रसंचालन, विविध गीतांचे सादरीकरण आणि संयोजन कौतुकास्पद ठरले. या आनंद मेळावा प्रसंगी ज्येष्ठांसाठीच्या 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' आणि 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' ची माहिती वारंवार प्रगट करणेचे कार्य सूत्रसंचालक श्री. बाबर सर यांनी केले.

* * *

## ✻ आवाहन ✻

**फेस्कॉम च्या सर्व प्रादेशिक विभागातील पदाधिकारी, समन्वय समितीचे पदाधिकारी, फेस्कॉम संलग्न सर्व ज्येष्ठ नागरिक संघ,व फेस्कॉम परिवारातील सर्व ज्येष्ठ आणि श्रेष्ठ बंधू भगिनींना नम्र आवाहन....**

फेस्कॉम चे मनोहरी मनोयुवा हे मुखपत्र आहे. डोंबिवली, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, अकोला, असा प्रवास करत करत आता ते मासिक स्वरूपात सुभाषनगर सांगली येथुन सन २०२१ पासून दरमहा प्रकाशित केले जात आहे.ज्येष्ठ नागरिक चळवळीची, जागतिक पातळीवरील, केन्द्र व राज्य पातळीवरील, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवरील ज्येष्ठांच्या संदर्भातील उपयुक्त माहिती यात वेळोवेळी दिली जाते.महाराष्ट्र शासनाचे अद्ययावत जी.आर आदेश दिले जातात, जेणेकरून त्यामुळे ज्येष्ठांना सेवा व मदत देणे सुकर होते. फेस्कॉम संलग्न सर्व ज्येष्ठ नागरिक संघांनी, समन्वय समित्यांनी व संघटनेतील सर्व कार्यकर्त्यांनी वार्षिक वर्गणीदार अगर आधारस्तंभ होणे गरजेचे आहे.आता फेस्कॉमचे राज्यस्तरीय अधिवेशन जानेवारी २०२५ मध्ये लातुर येथे् होत आहे.त्याची माहिती मनोयुवात दिली गेली तर ती आपणा पर्यंत पोहोचली पाहिजे,तरी नव्या, जुन्या सर्व ज्येष्ठ नागरिक संघांना प्रादेशिक विभागांकडून वर्गणी भरून सभासद करुन घ्यावे, तसेच नवीन ज्येष्ठ नागरिक संघांचे प्रस्ताव दाखल करताना वार्षिक वर्गणी, विकास निधी, प्रवेश फी बरोबरच मनोहरी मनोयुवा ची किमान वार्षिक वर्गणी प्राधान्याने घेत जावी.जे नव्याने ज्येष्ठ नागरिक संघ संलग्न झाले,पण मनोहरी मनोयुवा ची वार्षिक वर्गणी भरली नाही ती ही जमा करून घेण्यात यावी या बाबत सहकार्य करावे हि विनंती आहे.. धन्यवाद !!!

**अरूण माधव रोडे**
(अध्यक्ष फेस्कॉम)

**अण्णासाहेब टेकाळे**
(उपाध्यक्ष फेस्कॉम)

# फेस्कॉम नागरिक धोरण अंमलबजावणी...

(जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती)

फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल

ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणेची घटनेनुसार शासनाची जबाबदारी आहे. या अनुषंगाने शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी ''ज्येष्ठ नागरिक धोरण'' ठरविले आहे. शासनाने प्रशासनाच्या विविध विभागावर जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. ज्येष्ठ नागरिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी शासनाने दि.९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयाअन्वये सुचना दिलेल्या आहेत. भारतीय संविधानातील ३९क व ४१ मधील तरतुदीनुसार ज्येष्ठ नागरिकांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, सर्व त्रासातून त्यांची मुक्तता व्हावी या दृष्टीने केंद्र शासनाने आईवडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह कल्याण अधिनियम, २००७ कायदा संमत केला. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी व धोरणाची अंमलबजावणी प्रभावी होणेसाठी शासनाने प्रत्येक जिल्ह्यात मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली, दि.३१/१०/२०१९ च्या शासन निर्णयानुसार ''जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समिती'' गठीत केलेल्या आहेत. या समन्वय संनियंत्रण समितीद्वारा जिल्ह्यातील प्रत्येक ज्येष्ठाच्या, न्यायालयीन प्रकरणे वगळता, प्रत्येक अडचण दुर व्हावी हे अपेक्षित आहे. जिल्हास्तरावरील या समितीत फेस्कॉमचे दोन प्रतिनिधी सदस्य आहेत. दि.०९/०७/२०१८ व दि.३१/१०/२०१९ चे दोन्ही शासन निर्णय माहे जून २०२४ च्या मनोहारी मनोयुवा अंकात पुन्हा वाचकासमोर ठेवले आहेत.

ज्येष्ठ नागरिकांची कामे (न्यायालयीन प्रक्रियेखेरीज) लवकरात लवकर निर्गत होणेचे दृष्टीने मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील सभेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रादेशिक विभागाचे तसेच जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष यांनी अभ्यासपूर्वक विषयाची मांडणी केलेस जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळू शकणार आहे. सर्व वाचकांना विनंती करावीशी वाटते की, परिसरातील प्रत्येक पिडीत ज्येष्ठ नागरिक यांना सजग करावे.

जिल्हा स्तरावरील समितीच्या त्रैमासिक सभेत धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालील काही विषय प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांनी समितीचे सचिव (मा.सहा. आयुक्त समाज कल्याण) यांचेकडे समितीच्या सभेपूर्वी किमान १५ दिवस अगोदर सुचवावेत ही विनंती.

१) आईवडिल व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ अंतर्गत

अ) न्यायालयाकडील महसुल विभाग (जिल्हा दंडाधिकारी यांची कर्तव्ये तथा अधिकार) (प्रांताधिकारी) प्रलंबित प्रकरणांचा आढावा.

ब) कलम ५ व कलम ६(६) अन्वये समेटकर्ता अधिकारी नेमला जातो कां ? (समुपदेश)

क) कलम २३ नुसार ज्येष्ठ नागरिकांना न्याय मिळणे आवश्यक आहे.

ड) निर्वाह भत्ता अर्जदारास मिळत नसलेस न्यायालयामार्फत कार्यवाही.

इ) ज्येष्ठांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण बाबत.

**महसुल विभाग –**

कायद्यातील तरतुदी अन्वये शासनाने जिल्ह्यात आवश्यक त्या ठिकाणी मातोश्री वृध्दाश्रमाची सोय करावी.

**आरोग्य –**

कायद्यातील प्रकरण ४ अन्वये ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी.

**गृह विभाग/दंडाधिकारी –**

कायद्यातील प्रकरण ६ अन्वये ज्येष्ठ नागरिकांच्या जीविताचे व मालमत्तेचे संरक्षण केले जावे.

अ) प्रत्येक पोलीस ठाण्यात ''ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष'' गठीत करावा.

ब) प्रत्येक पोलीस ठाण्यात त्यांच्या कार्यक्षेत्रातील, एकाकी राहणाऱ्या ज्येष्ठांची यादी असावी. **(कलम २०(२)(१)) अन्वये.**

क) एकाकी जीवन राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या पोलीस/बीट अधिकाऱ्याने महिन्यातून किमान १ वेळा भेटी द्याव्यात. **(कलम २०(२)(२))**

ड) प्रत्येक पोलीस ठाण्यात **ज्येष्ठ नागरिकाच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिक समिती गठीत करावी.** त्यांच्या दरमहा सभा व्हाव्यात. (गृह विभागाचे पत्र क्र. 639358/H.D.- 58020/6/2023 - POLI3 - MHD - Home Department दि.१० जुलै २०२३)

इ) ज्येष्ठ नागरिकांसाठी विनाशुल्क हेल्पलाईन सुरु करावी. (कलम २०(२)(१५) अन्वये)

**(अतिशय महत्त्वाचे)**

**जिल्हाधिकारी आणि सहा.आयुक्त समाज कल्याण विभाग**

कलम २२ अन्वये जिल्हाधिकारी यांनी जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियंत्रण समितीची प्रत्येक तिमाहीत एक बैठक घ्यावी.

(टिप : काही जिल्ह्यात सभा घेतल्या जात नाहीत किंवा नियमित तिमाही सभा घेतल्या जात नाहीत.)

**(शासनाच्या आदेशानुसार ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांनी समितीच्या सचिवांना सक्त सुचना देणे आवश्यक असून प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी पाठपुरावा करणे आवश्यक आहे.)**

जिल्हा ज्येष्ठ नागरिक समन्वय संनियत्रण समितीच्या सभा नियमित होणे आवश्यक असून आईवडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ नुसार कांही विषय प्रादेशिक विभागासमोर ठेवले आहेत. या कायद्याचा सखोल अभ्यास करुन या समितीच्या त्रैमासिक सभेत विषय मांडून चर्चा करुन ज्येष्ठ नागरिकांना कायदेशीर न्याय मिळवून देणेचा प्रयत्न व्हावा ही अपेक्षा.

ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत अधिक मार्गदर्शन पुढील अंकापासून.

* * *

## सद्विचार

हिरे माणिक मोती
नाही येणार कुणी सोबती
जर केली जीवनभर पुण्याई
मरताना स्वर्गाचे दार उघडतील
खड्डा खोदतील जे इतरांसाठी
तेच खड्ड्यात जातील
चांगुलपणाचा आसरा ज्यांच्या मनाला
तेच स्थिर राहतील
मेहनत करतील जे
तेच यशाचे मानकरी ठरतील
जर मदत द्याल इतरांना
तेही तुमच्यासाठी पाठीराखे होतील
आयुष्याच्या पायऱ्या चढतांना
अनेक अनुभव वाट्याला येतात
मीच तुझा सर्वश्रेष्ठ गुरु आहे
याची ते ग्वाही देतात.

**श्री. राऊत के.व्ही. उर्फ कांबळे शिला**
मोबा.नं. ८७८८०९३७७४

# म्हातारपणी जमिनीचे वाटप करतांना

- शेखर गायकवाड
I.A.S. (निवृत्त)

('शेतकऱ्यांनो जमिनी सांभाळा' या पुस्तकातून साभार)

शेतजमिनीचे वाटप कसे करावे याबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आहे. जमिनीचे वाटप हे भावाभावांमध्ये व कुटुंबामध्ये नेहमी कलह निर्माण करणारे असते. शेतजमिनीच्या वाटपामध्ये त्यामुळे नेहमी गुंतागुंत निर्माण होते. एका भावाचे वाटप हे दुसऱ्यास सोयीचे वाटत नाही. किंबहुना तो त्यांच्या सोयीस मान्यता देत नाही. जमिनीशिवाय जमिनीत जाणारे रस्ते, विहिरीतील पाण्याचा हिस्सा, बांधावरील झाडे, घराची वाटणी, पाईपलाईनचा खर्च इत्यादी अनेक समस्या वाटपाच्या वेळी निर्माण होतात. त्यामुळे वाटपाची ही प्रक्रिया कागदावर येण्यापूर्वी अनेक महिने तर काही वेळा अनेक वर्ष चर्चेचे गुऱ्हाळ कुटुंबात चालु असते. त्यामुळे जमिनीचे वाटप कसे करावे हे समजून घेणे प्रत्येक शेतकऱ्याच्या हिताचे आहे. जमिनीचे वाटप कसे करावे हे बहुसंख्य लोकांना माहित असते. परंतु वाटप करतांना दूरदृष्टी फारच थोडे लोक दाखवतात. विशेषतः म्हातारपणी जमिनीचे वाटप करतांना तात्पुरता विचार करून वाटप मागणाऱ्या मुलांचा प्रश्न कसा सोडविता येईल असा विचार बरेच लोक करतात. परंतु काही वर्षे उलटल्यावर आपण वाटप बरोबर केले नाही असे त्यांच्या लक्षात येते. आपण याबाबत असेच एक उदाहरण पाहू.

संपतराव नावाचा एक शेतकरी होता. त्याला लक्ष्मण व महादु या नांवाची दोन मुले होती. थोरला लक्ष्मण तालुक्याच्या गावी नोकरीला होता व धाकटा महादु शेती बघत होता. वडील संपतराव आता म्हातारे होत आले होते. महादुने वडिलांना तुमच्या डोळ्यासमोर जमिनीचे वाटप करून द्या असा लकडा लावला होता. दोन्ही मुले समजुतदार असल्याने संपतरावाने महिन्याभरातच दोघांना निम्मी निम्मी जमीन वाटून दिली. वाटप करतांना खेळीमेळीत, नातेवाईकांच्या समोर वाटप झाले. दोन तीन वर्षे कोणताच प्रश्न निर्माण झाला नाही. वडील संपतराव अंथरुणावर खिळल्यावर महादु व लक्ष्मण या दोन भावांमध्ये भांडणे सुरू झाली. तालुक्याच्या गावी राहणाऱ्या लक्ष्मणला तालुक्याच्या गावी बंगला बांधायचा होता व त्यासाठी पैशाची गरज होती. त्यामुळे त्याने जामिनीला गिऱ्हाईक शोधायचे ठरविले. जमीन विकत घेणारे गिऱ्हाईक जमीन बघायला लागले. लक्ष्मणने त्यासाठी जमिनीचे उतारे व ७/१२ काढले. उतारे काढल्यावर आणि महादुशी चर्चा केल्यावर खालील अनेक गोष्टी त्याच्या ध्यानात आल्या.

१. शेतजमिनीच्या वाटपांमध्ये एकाही गटाची वाटणी सलग लक्ष्मण किंवा महादुकडे नव्हती.

२. लक्ष्मणच्या जमिनीत जाण्यासाठी स्वतंत्र रस्ता नव्हता. लक्ष्मण आता म्हाताऱ्या वडिलांबरोबर म्हणजे संपतरावांबरोबर भांडण करायला लागला. दोनही मुले एकमेकांबरोबर बोलायचे बंद झाले. उतरत्या वयात संपतरावाला आता नव्या संकटाला सामोरे जावे लागले. शिवाय म्हाताऱ्या संपतने स्वतःच्या नावाने अजिबात जमीन न ठेवल्यामुळे राहिलेले आयुष्य त्याला लाचारीने व नाईलाजाने कंठावे लागले.

हे उदाहरण पाहिले असता वाटप करतांना थोडी काळजी घेतली असती तर पश्चाताप करण्याची वेळ आली नसती. यावरून जमिनीचे वाटप करतांना किमान खालील प्रकारची काळजी घेतली जाऊ शकते.

१. कलियुगातील माणसांची बदलती वर्तणूक विचारात घेऊनच कोणताही निर्णय घेतला पाहिजे.

२. मुलांच्या मध्ये वाटप करतांना स्वतःकडे थोडी जमीन ठेवली पाहिजे.

३. वाटप करतांना पुढच्या पिढीमध्ये रस्त्याचे, बांधाचे, विहिरीचे, पाण्याच्या हिश्याचे प्रश्न निर्माण होणार नाहीत अशा पद्धतीने वाटप केले पाहिजे.

४. शक्यतो सलग जमीन प्रत्येकाच्या वाट्याला येईल असे बघावे.

५. जमिनीचे वाटप करतांना कायदेशीर प्रक्रिया पूर्णपणे पाळली जाईल अशी दक्षता घ्यावी.

६. पुन्हा कायदेशीर वाद निर्माण होतील अशा प्रकारचे दस्त निर्माण करू नयेत. अनेकवेळा पैसे वाचविण्यासाठी दस्त रजिस्टर न करणे, दहा रुपयांच्या स्टॅम्पवर काहीतरी लिहून घेणे असे शॉर्टकट केले जातात. परंतु पुन्हा वाद निर्माण झाल्यावर हे शॉर्टकट महाग पडतात.

७. सध्याच्या पिढीमध्ये सामाईक पाण्याच्या पाळ्या, सामायिक विहीर अशी रचना टिकणे अवघड आहे म्हणून शक्यतो स्वतंत्र विहीर वाटपामध्ये देण्याचा निर्णय घेतला पाहिजे.

८. वाटप करताना उलट सुलट विचार करून बघितला पाहिजे. १० वर्षानंतर, २० वर्षानंतर, आपल्या मृत्यूनंतर प्रॉपर्टीचे वाद मुलांमध्ये होऊ नयेत यासाठीचा विचार करावा.

* * *

# 'शासकीय आदेश, अंमलबजावणी व स्वानुभव' - व्यथा

ना. वा. दुमालदार
मो. ९४२३०६८६२८

मी २००६ पासून ज्येष्ठ नागरिक संघाचा / मनोहारी मनोयुवा या मासिकाचा सक्रिय आजीव सभासद आहे. कार्यक्रम व लेखन यामधून बरेच समाधान मिळते. मासिकातून ज्येष्ठांबाबतचे शासकीय आदेश वाचावयास मिळतात. शासन आपल्यासाठी किती काळजी करते? पण मला वाटते याची अंमलबजावणी नीट होत नाही. त्यामुळे ज्येष्ठांच्या समस्या वाढतच आहेत. तसेच दरवर्षी १ ऑक्टोबरला होणाऱ्या ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्ताचे शासकीय कार्यक्रमातून शासन, न्याय व्यवस्था व पोलीस यांचा ज्येष्ठांबद्दलचा जिव्हाळा, आश्वासने इ. पाहून तर खूपच संरक्षित वाटते. १८ वर्षाच्या सामुहिक अनुभवातून/कार्यक्रमातून सक्रियता समाधानकारक वाटते.

यानिमित्त माझा (वय ७९) प्रत्यक्ष अनुभव विषद करावासा वाटतो. माझे घरी दि. ५/५/२०२४ रोजी सकाळी १०.३० चे सुमारास शेजाऱ्याकडून (आई व २० वर्षाचा मुलगा) अचानक विध्वंसक हल्ला करून मानसिक धक्का दिला. माझे दृष्टीने ही घटना गंभीरच होती. कारण १) ते दोघेही विनापरवानगी घरात घुसले. २) अर्वाच्य शब्द वापरून धमकी दिली. ३) घरातील वस्तू अस्ताव्यस्त करून माझ्या पत्नीची (वय ७२) काठी मोडली. अशा बिकटसमयी मदत घ्यावी म्हणून आम्ही दोघांनी संयुक्तपणे सोलापूरचे पोलीस आयुक्तांना दि. ६/५/२०२४ रोजी समक्ष जाऊन फोटोसह तक्रार दिली. त्वरीत शेजाऱ्यांवर कारवाई होईल असे वाटले, पण कसचे काय? एक महिना झाला तरी काहीही कारवाई नाही.

तेव्हा परत आम्ही दोघांनी संयुक्तपणे दि. ६/६/२०२४ रोजी मा. सचिव, विधिसेवा प्राधिकरण, सोलापूर यांना फोटोसह अर्ज केला. पण अद्याप पोलीस व न्याय खात्याकडून ना उत्तर, ना कारवाई. फक्त मध्यंतरी एक पोलीस आरोपीस भेटून गेला व त्यांचा जबाब घेतलेचे समजले. वा!! फक्त जबाब घेतला म्हणजेच कडक त्वरीत कारवाई झाली का?

या स्वानुभवाने खात्री झाली की, 'कठीण समय येता कोण कामास येतो?' सन्मित्रांचे सदिच्छेने अजून तरी आम्ही दोघे सुरक्षित आहोत.

ज्येष्ठ संघटना/शासकीय आदेशाचा जय असो. जमलं तर प्राधान्याने प्रकरण हाताळून खरी कडक कारवाई केली तरच शासन आमचे खरे संरक्षक, नाही तर 'अजब आमचे सरकार'.

* * *

**ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यातील 'दिन' विशेष -**
**(१५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०२४)**

२७ सप्टेंबर – जागतिक पर्यटन दिन/ कर्णबधीर दिन
१ ऑक्टोबर – ज्येष्ठ नागरिक दिन/ रक्तदान दिन
२ ऑक्टोबर – वन्यपशू दिन
८ ऑक्टोबर – भारतीय वायुसेना दिन
१५ ऑक्टोबर – जागतिक अंध दिन/ भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन

## श्रीनिवासा मिल्क अँण्ड मिल्क प्रॉडक्टस्‌चे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. प्रशांत पाटील यांचे प्रायोजकत्वाखाली संपन्न झालेल्या 'मनोहारी आनंद मेळावा' कार्यक्रमातील काही क्षणचित्रे




उद्योजक श्री. प्रशांत पाटील यांचे हस्ते 'डिजिटल कौशल्य' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना श्री. चंद्रकांत महामुनी, पुणे




फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे यांचे हस्ते 'हास्य-आनंद निर्मिती' पुरस्कार स्वीकारताना धनराज दूध केंद्राचे श्री. दत्तात्रय शिंदे व कुटुंबिय




फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे यांचे हस्ते 'रुग्णसेवा' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना सौ. व श्री. दत्तात्रय कुलकर्णी




उद्योजक श्री. प्रशांत पाटील यांचे हस्ते 'निवृत्तसेवा' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना निवृत्त नायब तहसिलदार श्री. जयवंतराव दिवे




उद्योजक श्री. प्रशांत पाटील व फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे यांचे हस्ते 'प्रबोधन' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना श्री. अंजुमन खान




श्री. चंद्रकांत महामुनी व श्री. राजीव कुलकर्णी यांचे हस्ते रुग्ण सेवेबद्दल शुभेच्छा स्वीकारताना श्री. उरुणकर.




फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे व उद्योजक श्री. प्रशांत पाटील यांचे हस्ते 'उत्कृष्ट साहित्यिका' पुरस्कार स्वीकारताना कोल्हापूर महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. सुशिला ओडेयर

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2024-2026

## श्रीनिवासा मिल्क अ‍ॅण्ड मिल्क प्रॉडक्टस्‌चे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. प्रशांत पाटील यांचे प्रायोजकत्वाखाली संपन्न झालेल्या 'मनोहारी आनंद मेळावा' कार्यक्रमातील काही क्षणचित्रे





श्री. चंद्रकांत महामुनी व श्री. राजीव कुलकर्णी यांचे हस्ते रुग्ण सेवेबद्दल शुभेच्छा स्वीकारताना श्री. साळुंखे




फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे यांचे हस्ते शुभेच्छा व सत्कार स्वीकारताना अति ज्येष्ठ नागरिक श्री. अनंतराव पाटील




हेल्पेज इंडियाचे श्री. राजीव कुलकर्णी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना



फेस्कॉम अध्यक्ष श्री. अरुण रोडे मार्गदर्शन करताना



फेस्कॉम अध्यक्ष अरुण रोडे यांचे हस्ते सत्कार स्वीकारताना कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्री. बाबर व त्यांचे सहकारी.




जळगांव येथील कार्यक्रमात फेस्कॉम उपाध्यक्ष श्री. आणासाहेब टेकाळे यांचे हस्ते 'जीवन गौरव' पुरस्कार स्वीकारताना माजी फेस्कॉम अध्यक्ष मा. दत्तात्रय चौधरी




उद्योजक श्री. प्रशांत पाटील यांचे हस्ते 'समाजभूषण' पुरस्कार व स्मृतिचिन्ह स्वीकारताना हेल्पेज इंडियाचे श्री. राजीव कुलकर्णी

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :
**श्री. अंजुमन खान**
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,
______
______
______